# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/07/2023 (बुधवार) सकाळ


---

### नागपूर ग्रामीण जिल्हयाची वाहतुक केसेसबाबत विशेष मोहीम

नागपूर जिल्हा ग्रामीण जिल्हातंर्गत पोलीस स्टेशन मधील वाहतुक नियमन करणारे नियुक्त असलेले अधिकारी/अंमलदार व वाहतुक शाखा तर्फे वाहतुकीचे उल्लंघन करणाऱ्यां विरूध्द निरंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येते. वाढत्या अपघाताचे प्रमाण विचारात घेता व त्याचे विश्लेषण करून रस्ते अपघातांना आळा घालण्याकरीता अपघातास कारणीभुत ठरणाऱ्या कारणांवर विशेषत: लक्ष देवून त्याव्दारे दि. ०१/७/२०२३ ते १५/७/२०२३ पर्यत मोटार वाहन अधिनियम अंतर्गत वेगवेगळया मोहीमा आयोजित करून कारवाई करण्यात आली आहे. अपघातास कारणीभुत ठरणाऱ्यामध्ये मुख्यत: अवैध प्रवासी वाहतूक, विना हेल्मेट, वाहन चालवितांना मोबाईलचा वापर करणे, दारू पिऊन वाहन चालविणे, वेगमर्यादे पेक्षा वाहन चालविणे, विना सिटबेल्टचा वापर करणे ईत्यादी प्रकारच्या शिर्षकाखाली विशेष मोहीम राबवुन खालील प्रमाणे कार्यवाही करून दंड वसुल करण्यात आला आहे.

| Sr. No. | Head | Number of Cases | Fine Amount |
|---|---|---|---|
| 1 | Over Speeding Cases 112/183 | 395 | 790000 |
| 2 | Breach of Traffic Signal MMVR 239/177 MV | 66 | 37000 |
| 3 | Helmet 129/194 MV | 783 | 381500 |
| 4 | Clandestine Operation of Caring Passenger 66(1)/192-A | 14 | Non Compoundable |
| 5 | Seat belt 194(B)(1) | 1777 | 355400 |
| 6 | Drunk & Drive 185MV Act | 114 | Non Compoundable |
| 7 | Mobile 250(A) MV | 18 | 20000 |
| | **Total** | **3167** | **1583900** |
| 8 | Other Cases | 1381 | 718450 |
| | **Total Cases & Total Fine** | **4548** | **23,02,350** |

वरिल शिर्षकाखाली विशेष मोहीम राबवुन नागपूर जिल्हा ग्रामीण जिल्हातंर्गत पोलीस स्टेशन व वाहतुक शाखा तर्फे करण्यात आलेल्या ४५४८ कारवाईमध्ये रू. २३,०२,३५०/– ऐवढा दंड आकरण्यात आला असुन त्यामध्ये ३७५९ केसेस मध्ये रू. १३,७७,२५० दंड वसुल करण्यात आलेला आहे. उर्वरित ७८९ केसेसमध्ये रू. ९,२५,१००/– ऐवढा दंड वसुल करणे बाकी आहे. प्रलंबित चालान केसेस मध्ये दंड वसुली बाबत मोहीम सुरू आहे. सदर विशेष मोहीम कारवाईमुळे दि. १/७/२०२३ ते १५/७/२०२३ पर्यत घडलेल्या अपघाताची आकडेवारी पाहता अपघातांना आळा घालण्यास यश प्राप्त झाले आहे. अशाच प्रकारे दिनांक ३१/०७/२०२३ पर्यंत वरील शिषर्काखाली विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे नागपूर ग्रामीण जिल्हा अंतर्गत जिल्हा वाहतुक शाखा मधील रामटेक बिट, काटोल बिट, सावनेर बिट, उमरेड बिट, बोरी बिट व कन्हान बिट तसेच प्रादेशिक परिवहन विभाग यांच्यासह संयुक्तिकरीत्या जिल्हयातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविदयालय येथे होणारी शालेय परिवहन वाहतुकबाबत वापरण्यात येणारी स्कुल बस मार्गदर्शकतत्वा प्रमाणे सुनियमित वाहतुकीसंबंधाने स्कुल बसेसची पडताळणी/त्याचप्रमाणे वाहनाची

सर्वकागदपत्रे पडताळणी संबंधाने विशेष मोहीम राबवुन ज्या स्कुल बसचे कागदपत्रे परिपुर्ण आढळुन न आल्यास त्यांच्यावर प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्या मार्फत योग्य तो दंड आकारण्यात येवुन संबंधीत पोलीस स्टेशन मध्ये वाहन डिटेन करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही व त्याचे फलीत यात प्रामुख्याने मा. श्री. विशाल आनंद (भापोसे), पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. डॉ. संदिप पखाले, अपर पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण, मा. श्री. विजय माहुलकर, प्रभारी पोलीस उप अधिक्षक (गृह), नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली सहकारी अधिकारी/कर्मचारी यांचे सहभागाने राबविण्यात येत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. अरोली :–** दिनांक १७/०७/२०२३ चे १६.३० वा. १७.०० वा. दरम्यान पो.स्टे. अरोली हद्यीत फिर्यादीची मुलगी वय १७  वर्षे, १० महिने ही घरी हजर असता फिर्यादी ही किराणा सामान आणणे कामी आदासा गावामध्ये गेली होती. तेव्हा मुलगी ही मोठया मुलासोबत घरीच हजर होती. फिर्यादी ही घरी सामान घेवुन परत आली असता मुलगी ही घरी दिसली नाही. फिर्यादी हिने मुलाला मुली विषयी विचारले असता त्याने माहीत नसल्याचे सांगीतले. यावरून फिर्यादीने मुलीचा गावात नातेवाइकाकडे व इतरत्र शोध घेतला असता मिळुन आली नाही. फिर्यादीच्या मुलीला कोणीतरी अज्ञात ईसमाने अज्ञानाचा फायदा घेवुन फुस लावुन पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार टिकाराम जाधव ब. नं. १३३१ मो. नं. ८८८८८२१३७६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**